जावक क्र./न्याय/ 2180 / 2016
धर्मादाय आयुक्त,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे
कार्यालय
दिनांक :- 20 APR 2016

परिपत्रक क्रमांक :-460/2016 दिनांक :- 20/04/2016

असे निदर्शनास येते की, कलम 36(1)(अ), कलम 36(ए)(3), कलम 70, कलम 70-अ, कलम 41-ई, कलम 47, कलम 41-ड, नियम 36 (I),(II),(III),(IV), कलम 50-अ, कलम 36(2), कलम 83, कलम 35, कलम किरकोळ या प्रकरणांचे संदर्भात पक्षकार अर्ज/पत्र आवक लिपीकाकडे सादर करतात. हे अर्ज गहाळ होतात अथवा संबंधित अधिका-यापूढे ठेवले जात नाहीत असे होऊ नये म्हणून आदेश करण्यात येतो की, असे अर्ज/पत्र आवक लिपिकांनी स्विकारु नयेत. असे अर्ज/पत्र अधिक्षक (न्याय शाखा) यांच्याकडे दाखल करावे त्यांनी असे अर्ज/पत्र कोणत्या प्रकरणाशी संबधित आहे ते शोधून ते प्रकरण ज्या अधिका-यांकडे प्रलंबित असेल त्यांचेकडे त्यांचे शिरस्तेदार/ वरिष्ठ लिपीक यांचे मार्फत सादर करावेत. सबंधित शिरस्तेदार/ वरिष्ठ लिपीक यांनी असे अर्ज/पत्र 3 दिवसांचे आत संबंधित अधिका-यापूढे सादर करुन त्यावर त्यांचे आदेश घ्यावे.

असे अर्ज/पत्रा संदर्भात कोणतेही प्रकरण न्याय प्रविष्ठ नसल्यास अधिक्षक (न्याय) यांनी सदरचे प्रकरण निकाली काढावेत. असे निकाली काढलेले अर्ज/पत्र एक वर्षानंतर नाशन करावेत. सर्व शिरस्तेदार/वरिष्ठ लिपिक यांनी त्यांच्याकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणांची यादी न्यासाच्या नावासह दर महिण्यांत 3 तारखेच्या आंत अधिक्षक (न्याय) यांचेकडे सादर करावी.

या परिपत्रकाचे काटेकोर अनुपालन व्हावे. कसुर करणा-याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

Seen
20/4/16

धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत:-

(1) धर्मादाय सह आयुक्त (1)
(2) धर्मादाय सह आयुक्त (2)
(3) धर्मादाय सह आयुक्त (3)
(4) सर्व शिरस्तेदार/वरिष्ठ लिपीक
(5) सर्व अधिक्षक
(6) आवक लिपीक
(7) कार्यालयीन आदेश धारिणी